# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## कोव्हिड–१९ प्रतिबंध अंतर्गत कंत्राटी भरती जाहिरात

### —: थेट मुलाखती (Walk in Interview) :—

कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्याच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महापालिकेच्या रुग्णालयीन सेवेसाठी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदांसाठी तात्पुरती प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेनुसार साथरोग कालावधीसाठी पात्र उमेदवारांची निव्वळ तात्पुरत्या/ अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेकामी थेट मुलाखती आयोजित करण्यांत आलेल्या आहेत.

| अक्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी ( Intensivist/Physician ) | ३० | M.D./D.N.B Medicine / Anaesthesia M.D. Pulmonary Medicine/Critical care/IDCCM/MBBS,DA/MBBS,DTCD with IDCCM with 2 years experience. | रु.२५००००/— |
| २ | हॉस्पीटल मॅनेजर ( Hospital Manager ) | ८ | Any Medical Graduate with one year experience of Hospital Administration. | रु.३५०००/— |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (General) ( M.B.B.S.) | १२० | M.B.B.S. | रु.७५०००/— |
| ४ | आयुष वैद्यकीय अधिकारी ( Ayush Medical Officer ) | १२० | B.A.M.S. / B.H.M.S. / B.U.M.S. | रु.५००००/— |
| ५ | स्टाफ नर्स ( Staff Nurse )/ सहा.परिचारीका प्रसविका ( A.N.M. ) नर्सिंग असिस्टंट | ५८८ | G.N.M. / B.Sc. Nursing. (स्टाफ नर्सच्या एकूण जागांपैकी आवश्यक त्या संख्येइतके G.N.M. / B.Sc. Nursing पात्रता धारक उमेदवार न मिळाल्यास A.N.M. /नर्सिंग असिस्टंट पात्रता धारक उमेदवारांमधून नियुक्ती केली जाईल. | स्टाफ नर्स — रु.३००००/— ए.एन.एम. — रु.२५०००/— नर्सिंग असिस्टंट रु.२००००/— |
| ६ | एक्स–रे टेक्निशियन ( X-Ray Technician ) | १४ | Diploma in X-Ray Technician. | रु.२२५००/— |
| ७ | फार्मासिस्ट ( Pharmacist ) | १५ | B.Pharm. / D.Pharm. | रु.२२५००/— |
| ८ | ईसीजी. टेक्निशियन ( ECG. Technician ) | ९ | Diploma in ECG. Technician and experience of ECG Technician at least one year. | रु.२२५००/— |
| ९ | लॅब टेक्निशियन ( Lab Technician ) | २४ | B.Sc. DMLT. | रु.२२५००/— |
| १० | वॉर्डबॉय ( Ward Boy ) | ८० | 10th Pass. | रु.१८०००/— |

**(अ) मुलाखतीचे ठिकाण** :— आयुक्त कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (प.)

**(ब) थेट मुलाखतीचा दिनांक** :— **दि.३०/६/२०२० (मंगळवार)** — अ.क्र.१ ते ९ मधील पदे
**दि.१/७/२०२० (बुधवार)** — अ.क्र.१० मधील पद (वॉर्डबॉय)

**(क) उमेदवारांची नोंदणी आणि मुळ कागदपत्रे छाननी व तपासणी.** :— सकाळी ११.०० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत.

**(ड) थेट मुलाखतीची वेळ** :— दुपारी २.०० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**( टिप :— रिक्त पदसंख्येपेक्षा कमी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास मुलाखती न घेता नियुक्ती देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल )**

**अटी व शर्ती :–**

**(१) वयोमर्यादा** :– मुलाखतीचे दिवशी उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय खुला प्रवर्गासाठी ३८ **वर्षे व** मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. प्रतिसाद कमी असेल त्या पदांसाठी सदर अटी शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

(२) उमेदवारास नियुक्ती दिल्यास त्याने २४ तासात कामावर हजर होणे आवश्यक आहे.

(३) सदरची नियुक्ती ही कंत्राटी पध्दतीने पूर्णपणे तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपाची व कोव्हिड–१९ साथरोग कालावधीसाठी आहे. साथरोगाचा प्रादूर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. त्यापुढे त्यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

(४) उमेदवारांनी संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पूर्ण स्पष्ट पत्ता, भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक, मेल आयडी, जन्मतारीख, वय, धारण शैक्षणिक अर्हता, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव इत्यादी तपशिल कॉलमनिहाय स्पष्ट व स्वच्छ अक्षरात अथवा टंकलिखित स्वरुपातील अर्ज प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस सादर करावयाचा आहे. (सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.) तसेच मुलाखतीस येताना उमेदवाराने त्याचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादी मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. तसेच त्यांचा एक संच झेरॉक्स प्रतीचा अर्जासोबत जोडावा. मुलाखतीच्या वेळी मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध न करुन दिल्यास मुलाखत घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(५) वरीलप्रमाणे पदांसाठी यापुर्वी प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत. त्यामधील ज्या उमेदवारांची नावे प्रतिक्षा यादीत, पात्रता यादीत अंतर्भूत आहेत अशा उमेदवारांनी सदरहू जाहिरातीप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावयाचे आहे. तसेच ज्या उमेदवारांनी यापुर्वी झालेल्या थेट मुलाखतीनंतर वरीलप्रमाणे पदांसाठी महापालिकेत अर्ज सादर केलेले आहेत अशा उमेदवारांनी सुध्दा सदरहू जाहिरातीप्रमाणे थेट मुलाखतीस उपस्थित राहावयाचे आहे.

(६) अर्जदार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.

(७) अर्जदार विवाहीत महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र / नावात बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(८) थेट मुलाखतीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

(९) नियुक्तीनंतर सेवा सोडणेसंदर्भात एक महिना पुर्वसूचना न देता परस्पर सेवा सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

(१०) वेळोवेळी लागू करण्यांत येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबंधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार आयुक्त, क.डों.म.पा. कल्याण यांना राहतील.

**( डॉ.विजय सूर्यवंशी )** भा.प्र.से.
**आयुक्त,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## कंत्राटी पध्दतीने कोव्हिड–१९ प्रतिबंध अंतर्गत भरती

प्रति,
मा.आयुक्त,
कल्याण डोबिवली महानगरपालिका,
कल्याण.

| उमेदवाराचा फोटो |
|---|

**विषय :– ———————————— पदासाठी अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मी कंत्राटी पध्दतीने नियुक्तीकामी ——————————— या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून, सदर पदासाठी निवड होण्यासाठी सदरहू अर्ज सादर करीत आहे.

**१) संपूर्ण नांव** : ————————————————————————————

**२) पत्रव्यवहाराचा पत्ता** : ————————————————————————————

————————————————————————————

ता.——————— जि.——————— पिन ———————

**३) ई–मेल आय.डी.** : ———————————————— मोबाईल क्र. ———————

**४) जन्मदिनांक** : ——————— ( आजरोजीचे वय ——— वर्षे, ——— महिने )

**५) लिंग** : पुरुष / स्त्री

**६) जात** : ——————

( S.C. / S.T. / V.J.(A) / N.T. (B) / N.T. (C) / N.T. (D) / OBC / S.B.C. / OPEN / SEBC / EWS )

**७) शैक्षणिक अर्हता** :

| अक्र | शैक्षणिक अर्हता | विद्यापिठ/बोर्ड/संस्थेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | परिक्षेचे एकूण गुण | परिक्षेत प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**८) अनुभवाचा तपशिल** :

| अक्र | संस्थेचे नाव व पत्ता | पद | कार्यरत कालावधी | | एकूण कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**९) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र क्र.: —————— दिनांक : ————— प्रमाणपत्र वैधतेचा दिनांक : —————**

वर नमूद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, माझेविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसून, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे कंत्राटी भरतीच्या नोकरीवरुन कमी करण्यास पात्र राहील व त्याबात माझेविरुध्द कायदेशिर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

| अक्र | **कागदपत्रे** | जोडले आहे | जोडले नाही | अक्र | **कागदपत्रे** | जोडले आहे | जोडले नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्मदिनांक पुरावा | | | ५ | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | | |
| २ | जात प्रमाणपत्र | | | ६ | अनुभव प्रमाणपत्र | | |
| ३ | शैक्षणिक अर्हता | | | ७ | ओळखपत्र | | |
| ४ | अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र | | | | | | |

ठिकाण : कल्याण

अर्जदाराची सही : ————————————

दिनाक : / /२०२०

( नांव : ———————————— )

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## कार्यालयीन तपासणी

**उमेदवाराचे नांव** :– ----------------------------- **पदनाम** :– --------------------------------

उपरोक्त उमेदवाराने सादर केलेली कागदपत्रे तपासली असून, उमेदवार हा मुलाखतीस **पात्र** आहे.

सही :

तपासणी अधिकाऱ्याचे नाव : ---------------------------

दिनांक : / /२०२० व पदनाम

## किं वा

उपरोक्त उमेदवाराने सादर केलेली कागदपत्रे तपासली असून, उमेदवार हा मुलाखतीस **अपात्र** आहे.

कारण ----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

सही :

तपासणी अधिकाऱ्याचे नाव : ---------------------------

दिनांक : / /२०२० व पदनाम